# MARATHI LANGUAGE II
# STANDARD XI
# PATTERN FOR FIRST TERMINAL (FIRST SEMISTER)

| | | |
|---|---|---|
| Date :21-01-2016 | Sub : Marathi (Language II ) | Marks : 80 |
| Total No. of Questions : 08 | (Printed Pages :05 ) | Time : 2.30hrs. |

Pa

सूचना ः १. शुद्धलेखनाचे नवीन नियम पाळावेत.

२. उजवीकडील अंक प्रश्नांचे पूर्ण गुण दर्शवितात.

प्र. १. (अ)खालीलपैकी कोणत्याही एका वाक्याचे संदर्भासह स्पष्टीकरण लिहा. ०५

१.'आपण फक्त जिने असतो.फक्त जिने!'

२."पण तू तरी कशाला इतका वेळ वाचत बसलास म्हणते मी!"

प्र. १. (ब) खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर प्रत्येकी ७ ते ८ ओळींत लिहा. ०५

१.संत ज्ञानेश्वरांनी आदर्श समाजाचे चित्र कसे रेखाटले आहे ?

२.सणा- समारंभाना कालसुसंगत नवे रूप कसे देता येईल ?

---

प्र. २. (अ) खालीलपैकी कोणत्याही एकाचे संदर्भासह स्पष्टीकरण लिहा. ०५

१.हृदय बंदिखाना केला | आंत विट्टल कोंडिला ||

२.वेडया पोफळी उगाच
तिला पाहती पाण्यात

प्र.२.(ब)खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर प्रत्येकी ७ते ८ओळींत लिहा. ०५

१. फादर स्टिफन्स यांनी मराठी भाषेची महती कशी गायिली आहे?

२.दा.अ.कारे यांनी गोमन्तभूमीचे वर्णन कसे केले आहे?

---

प्र. ३. (अ) खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी ३ ते ४ ओळींत लिहा. ०६

१.वडिलांचे पत्र सांभाळून ठेवायला हवे होते असे विनोबांना का वाटते ?

२.मोठेपणी झेल्या कसा वागत असेल असे लेखकाला वाटते ?

३.कथानायक लहानपणी कोणते उपद्व्याप करायचा ?

प्र. ३. (ब) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा. ०२

१. अप्पासाहेब कावेरीला कोणत्या नावाने हाक मारायचे ?
२. लोकमान्य टिळकांनी कोणता ग्रंथ लिहिला ?

प्र. ३. (क) खालील कवितेच्या ओळी कंसातील योग्य शब्द वापरून पूर्ण करा. ०४

१. धरिला पंढरीचा ______ |गळा बांधोनियां दोर || ( चोर, थोर, मोर )
२. तळी ______ कोमल तेथे
भाव दर्वळला मुका. ( जाईचा, जुईचा, सईचा)

३. घरासाठी दोन जीवांचा
खराखुरा ______ लागतो. ( वेळ, खेळ,मेळ)

४. तर गाव ______ देतो दारावर. ( चाप, थाप, धाप)

---

प्र. ४. (अ) खालील वाक्यातील अधोरेखित शब्दांच्या जाती लिहा. ०५
१. तेव्हा कुठे <u>ती</u> एक ढब्बू पैसा हाता<u>वर</u> टिकवी.
२. एक तर सर्वांना <u>शस्त्रे</u> वापरण्याची परवानगी नव्हती <u>व</u> <u>दुसरी</u> गोष्ट अज्ञान.

प्र. ४. (ब) खालील वाक्ये कंसात दिलेल्या सुचनेप्रमाणे बदलून लिहा ०५

१. तुमच्या जीवनात (कस्तुरी)सुगंध कोठून आला? (कंसात दिलेल्या शब्दाला योग्य प्रत्यय लावा)

२. उद्यापासून तू शाळेत जाणार का? (आज्ञार्थी करा)

३. मी अभ्यास केला. (भविष्यकाळात लिहा.)

४. मी मडगावला जाणार. (भूतकाळात लिहा.)

५. ही भेट मला माझ्या (बहिण)दिली आहे. कंसात दिलेल्या शब्दाला योग्य प्रत्यय लावा)

---

प्र. ५. (अ) खालील शब्दांची भाववाचक नामे लिहा . ०२
अ. पंडित आ. प्रेमळ

प्र. ५. (ब) खालील शब्दांची विशेषणे लिहा. ०२
अ. स्वावलंबन आ. पावित्र्य

प्र. ५. (क) खालील शब्दांचे विरूद्धार्थी शब्द लिहा. ०२

अ. पूर्ण आ. अनुकूल

प्र. ५. (ड) खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा. ०२

अ. जल आ. आनन

प्र.५.(इ) खालील शब्दसमूहाऐवजी एक शब्द लिहा ०२

अ. पक्ष्यांचा समूह आ.दुस-यांना सदैव उपयोगी पडणारा.

---

प्र. ६.(अ) खालील उतारा वाचून त्या खाली दिलेल्या प्रश्नांची योग्य उत्तरे लिहा. ०५

आश्रमाला लागूनच संग्रहालय होते. तिथल्या पुस्तकांच्या दुकानात गांधीजींचे सगळे साहित्य होते. तिथून मी गांधीजींची 'आत्मकथा' विकत घेतली. ती मी पूर्वी कधीच वाचली नव्हती. त्या आत्मकथेला गांधीजींनी नाव दिले होते, 'माझे सत्याचे प्रयोग' आणि त्यामध्ये गांधीजी आपल्या जीवनातील सगळया गोष्टी बिनधास्त वर्णन करून सांगत होते. ते वाचून मी चकितच झालो. मला वाटले होते की, गांधीजी महात्मा झाले म्हणजे ते लहानपणापासूनच 'ग्रेट' असतील. पण तसे काहीच नव्हते. गांधीजीच सांगत होते त्याप्रमाणे, ते अगदी सुमार विद्यार्थी होते. त्यांना गणित यायचे नाही. ते शिक्षकांची टिंगलटवाळी करायचे. चोरून विडया ओढायचा त्यांना नाद लागला होता आणि त्यासाठी त्यांनी घरातल्या नोकराच्या खिशातूनच पैसे चोरले होते. इतरही वाईट सवयी त्यांना होत्या. मुख्य म्हणजे वयाच्या सातव्या वर्षीच त्यांचे लग्न ठरले होते! आणि तसे ठरण्याची ती तिसरी वेळ होती. त्या आधी दोनदा साखरपुडा झाला होता, पण त्या दोन्ही मुली मरण पावल्या होत्या. प्रत्यक्ष लग्न लागले ते तेराव्या वर्षी. कस्तुरबांबरोबर. ते वाचून धक्काच बसला. सातव्या वर्षी साखरपुडा आणि तेराव्या वर्षी लग्न? काय अवस्था झाली असेल त्या मुलाची? कसला काळ होता तो? मग पुढे गांधीजींनी आणखीही गोष्टी सांगितल्या होत्या. इथे कॉलेज जमत नाही म्हणून इंग्लंडला कसे गेले, तिथल्या वेगळया वातावरणात कशी त्रेधातिरपीट उडाली, खाण्यापिण्याचे हाल कसे व्हायचे, अभ्यास कसा जमायचा नाही, वगैरे, वगैरे. पुस्तकाला 'माझे सत्याचे प्रयोग' असे नाव दिले असले तरी तरी खरे नाव पाहिजे होते, ते म्हणजे 'माझ्या चुकांची कबुली.'

(पान - २०) 'शाळेत न जमलेला निबंध'
'साधना - बालकुमार दिवाळी विशेषांक २०१२'
लेखक : मिलींद बोकील



प्रश्न (१) गांधिजींच्या आत्मकथेचे नाव काय ? (०१)

(२) लहानपणी गांधीजी कसे होते ? (०२)

(३)गांधीजींच्या पुस्तकाला खरे नाव कोणते असायला हवे होते असे लेखक म्हणतात? (०१)

(४) उता-याला योग्य शीर्षक लिहा. (०१)

प्र.६(ब). शिवानंद उच्च माध्यमिक विद्यालय, म्हापसा येथे पार पडलेल्या शिवजयंतीचा वृत्तांत ८ ते १० ओळींत लिहा. ०५

- **अंतीम सत्रांत परीक्षेत वृत्तांतलेखनाच्या ऐवजी संवादलेखन. ***

---

प्र. ७. (अ) 'स्वरूप उच्च माध्यमिक विद्यालय', पणजी आयोजित गांधी जयंती समारंभाची कार्य कमपत्रिका तयार करा. ०६

- **अंतीम सत्रांत परीक्षेत कार्यकमपत्रिकेऐवजी अर्जलेखन (केवल नोकरीसाठी अर्ज.) ***

**उदा : दै. सन्मानमध्ये आलेली खालील जाहिरात वाचून आपण सचिन सालसकर \ सचिता सालसकर, 'पावन' ४३२, कोंबा-मडगाव-गोवा असे समजून खाली नमूद केलेल्या पदासाठी अर्ज करा. ०६**

दै. सन्मान

२८ मार्च २०१५




पहिजे

**व्यवस्थापक**

शैक्षणीक पात्राता : कोणत्याही शाखेचा पदवीधर

वाणिज्य पदवीधरास प्राधान्य

संगणकाचे ज्ञान अत्यावश्यक

**अनुभव : कमीत कमी दोन वर्षे**

**संपर्क \ अर्ज करा :**

संचालक, सुधिर पॅकेजींग, ब-७७

श्रीस्थळ औद्योगिक वसाहत, श्रीस्थळ-काणकोण-गोवा.

प्र.७.(ब) खालीलपैकी कोणत्याही दोन वाक्प्रचारांचा अर्थ सांगून त्याचा वाक्यात उपयोग करा.

०४

१. डोके चढणे २.रस्ता काढणे ३.तोंड गोरेमोरे होणे

---

प्र. ८. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर सुमारे वीस ओळींचा निबंध लिहा. ०८

१ ः वैचारिक निबंध २ ः चरित्रात्मक निबंध

३ ः वर्णनात्मक निबंध ४ ः आत्मवृत्तात्मक निबंध

५ः सद्यस्थितीवर आधारित

---

******